ISSN: 2347-2723 Impact Factor :2.0260(UIF) Volume - 4 | Issue - 3 | October - 2016

Review of Literature

# भारताचे परराष्ट्र धोरण व शेजारील राष्ट्रे

प्रा. निकम अधिकराव हिंदूराव
राज्यशास्त्र विभाग , श्री.विजयसिंह यादव कला व विज्ञान महाविद्यालय, पेठ वडगांव.




**प्रस्तावना :**

कोणत्याही देशाच्या परराष्ट्र धोरणाचे राष्ट्रहीत हेच उद्दिष्ट असते. परराष्ट्र धोरण हे त्या देशाचे भौगोलिक स्थान, इतिहास सामाजिक राजकीय आर्थिक स्थिती यावरून ठरत असते. भारतीय परराष्ट्र धोरणाची पायाभूत तत्वे ही स्वातंत्र्यचळवळीबरोबर विकसीत होत गेली. स्वातंत्र्यापुर्वीच भारताचे परराष्ट्र धोरण काय असावे हे निश्चित झाले होते. त्यासंबंधिची भुमिका जवाहरलाल नेहरू यांनी स्पष्ट केली होती. त्या काळात पं. नेहरू वगळता कोणत्याही कॅाग्रेस नेत्याला भारतो परराष्ट्र धोरण काय असावे? याबद्दल रस नव्हता. हे एका दंतकथेरून स्पष्ट होते. एका कॅाग्रेसच्या अधिवेशनात पं. नेहरू आंतराराष्ट्रीय राजकारणावर भाषण करीत होते, त्यावेळी सरदार पटेल आपल्या शेजारी बसलेल्या कॅाग्रेस नेत्यास म्हणाले ''नेहरूंचा सर्व जगाचा फेरफटका पुरा होऊन ते हिंदूस्थानात आले की मला जागे करा तो पर्यंत मी झोप काढतो'' पंडीत नेहरूंनी स्वातंत्र्यनंतर साडेसतरा वर्षे पंतप्रधान या नात्याने परराष्ट्र धोरणाची निर्धारीत केलेली उद्दिष्टे प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न केला म्हणूनच भारताच्या परराष्ट्र धोरणाचे जनक म्हणून पं. नेहरूंचा उल्लेख केला जातो. त्यांचा भारताच परराष्ट्र धोरणावर एवढा प्रभाव होता की, भारताचे परराष्ट्र धोरण म्हणजे नेहरू असे समिकरण बनले होते. याबाबत परराष्ट्र धोरणाचे अभ्यासक इंदर मल्होत्रा हे म्हणतात. “No leader anywhere in the world has had such a profound & over riling in formulating administrating & articulating a countries foreign policy as Nehru did here” Eg.kwup 1942 मध्ये महात्मा गांधी म्हणाले की, “in international affairs Nehru is my Guru.”

सप्टेंबर १९४६ ला पं. नेहरू यांनी भारतीय परराष्ट्र धोरणाची प्रमूख आधारभूत तत्वे एका पत्रकार परिषदेतील घोषणेत स्पष्ट केली होती ही तत्वे पुढील प्रमाणे.

१.भारत संयुक्त राष्ट्रसंघटनेला पुर्ण समर्थन आणि सहकार्य देईल. संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या घटनेशी भारत बांधिल असेल. संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या कार्यात भारताच्या सक्रीय सहभाग असेल.

२.भारत स्वातंत्र परराष्ट्र धोरण आखण्याच्या पक्षात असेल. परराष्ट्र धोरणाच्या क्षेत्रातील कोणताही निर्णय हा बाहृय राष्ट्राच्या दबावाखाली घेतला जाणार नाही.

३.सत्तेच्या राजकारणाला भारताचा विरोध असेल. भारत स्वतःला कोणत्याही लष्करी गटात किंवा शितयुध्दाच्या राजकारणातून निर्माण झालेल्या गटामध्ये समाविष्ट करून घेणार नाही.

४.भारत वसाहतवादाचा विरोध करेल तसेच वसाहतवादविरोधी संघर्ष करणा-या सर्व लोकांना भारताचा पाठिंबा असेल.

५.सर्व शांतताप्रीय राष्ट्राबरोबर भारताचे मैत्रीपूर्ण आणि सहकार्याचे संबंध असतील.

६.शेजारी राष्ट्रे आणि सर्वच महासत्ता बरोबर भारताचे सहकार्याचे संबंध असतील आणि या राष्ट्राच्या सहकार्यातून भारत आपला आर्थिक आणि सामाजिक विकास साधेल.

७.भारत वंशवादाचा आणि सर्व प्रकारच्या शोषणाचा तिव्र विरोध करेल.

पं. नेहरूंच्या परराष्ट्र धोरणात अलिप्तता आणि पंचशील समावेश होतो. त्याचे अलिप्तता धोरण चार तत्वावर आधारलेले होते.

१.शांतता २. निशस्त्रीकरण ३. विकास ४. परस्परावलंबीत्व

स्वातंत्र्यपूर्व काळात परराष्ट्र धोरणाची ही तत्वे निश्चित करण्यात आली होती. विशेष म्हणजे यापैकी कोणत्याही तत्वामध्ये स्वातंत्र्योत्तर काळात बदल करण्यात आलेला नाही. आजही ही तत्वे परराष्ट्र धोरणास मार्गदर्शन करीत आहोत. १९६० च्या दशकात गृहीत धरून ठरविण्यात आली. पण विशेष म्हणजे या नविन तत्वांनी जागा घेतली नाही. जुनी तत्वे अद्यापही कायम ठेवण्यात आलेली आहेत. जागतिक शांतता, सहकार्य संपूर्ण निशस्त्रीकरण सामुहिक सुरक्षितेला समर्थन, आत्मनिर्भरता, स्वतंत्र परराष्ट्र धोरण

आदी तत्वे आजच्या परिस्थितीमध्येही उपयुक्त असून भारताच्या परराष्ट्र धोरणाला मार्गदर्शन करीत आहेत. आशिया, आफ्रिका खंडातील राष्ट्राबरोबर सहकार्याचे धोरण त्यांच्या प्रश्नाविषयी संवेदनशिलता या राष्ट्रांना मदत करण्याविषयीची तत्परता हे नेहरूच्या काळापासून चालत आलेले परराष्ट्र धोरणाचे तत्व आजही २१ व्या शतकात भारतीय परराष्ट्र धोरणकर्त्यांनी चालू ठेवले आहे. हे भारतामध्ये आत्तापर्यंत सत्तेवर आलेल्या अनेक सरकारांच्या परराष्ट्र धोरणावरून दिसून येते.

१९९० नंतर भारतीय परराष्ट्र धोरणात आलेले Look east चे धोरण आणि भारताचे माजी पंतप्रधान इंद्रकुमार गुजराल यांनी आपल्या प्रसिध्द गुजराल धोरणामध्ये आपल्या शेजारील राष्ट्राशी संबंध सुधारण्यास प्राधाण्य दिले या धोरणांतर्गत १९९६ मध्ये असे ठरवण्यात आले की भारताच्या शेजारील श्रीलंका, बांग्लादेश, भुतान, मालदीव आणि नेपाळ या राष्ट्रांना कोणत्याही परतफेडीची अपेक्षा न ठेवता आर्थिक सहाय्य दयायचे हे धोरण Princple of Non Reciprocity म्हणून ओळखले जाते. गुजराल यांची Gujral Doctrin ही नेहरूंच्या परराष्ट्र धोरणावरतीच आधारलेली आहे आणिप आजही भारत त्यामार्गाने वाटचाल करत आहे.

स्वातंत्र्योत्तर काळापासून भारताचा संपूर्ण निशस्त्रीकरणाच्या धोरणाला पाठींबा आहे. भारताचा अणूशक्ती विकासाचा कार्यक्रम हा केवळ शांतता आणि विधायक कामासाठी असेल असे पंडीत नेहरू यांनी सुरूवातीला स्पष्ट केले होते. अण्वस्त्रांच्या विध्वंसक परिणामांची भारताला जाणीव असल्यामूळे सुरूवातीपासूनच भारताचे प्रयत्न अण्वस्त्रमुक्त विश्वाच्या निर्मितीच्या दिशेने होते. त्यामूळेच भारताने १९६८ मध्ये करण्यात आलेल्या अण्वस्त्र प्रसारबंदी कराराला स्पष्ट विरोध केला. १९९५-९६ मध्ये सर्वसमावेशक अणुचाचणीह बंदी करार करण्यात आला. याकरारामध्ये पाच बड्या निशस्त्रीकरणाचे उद्दिष्ठ साध्य करणारा नव्हता परिणामी भारताने या करारावर स्वाक्षरी करण्याचे नाकारले. भारताने १९८५ मध्ये राजस्थानमधील पोखरण येथे अणूचाचण्या घेवून स्वतःला अण्वस्त्रधारी राष्ट्र म्हणून घोषित केले. तरी भारती ही अण्वस्त्र क्षमता आक्रमणासाठी नाही तर स्वरक्षणासाठी आहे. तसेच अण्वस्त्रांचा प्रथम वापर न करण्याचे भारताने बंधन घालून घेतले आहे एवढेच नव्हे तर २००९ साली भारताने आपल्याकडील रासायनिक शस्त्रांचा साठा नष्ट केला. भारताने हे धोरण म्हणजे नेहरूंच्या निशस्त्रीकरण व जागतिक शांतता या तत्वानुसार आहे.

संयुक्त राष्ट्र संघटनेवर सुरूवातीपासूनच पं.नेहरूनी विश्वास ठेवला जागतिक शांतता निर्माण करण्यात संयुक्त महत्वाची भुमिका बजाऊ शकतो असे पं. नेहरूना वाटत होते त्यामूळेच भारत पं. नेहरूच्या काळापासून आजपर्यंत संयुक्त राष्ट्र संघटनेच्या शांती मोहिमांमध्ये सहभागी होत आला आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या शांती मोहिमामधील कारणमिमांसा भारताचे माजी पंतप्रधान इंद्रकुमार गुजराल यानी स्पष्ट केली त्याच्यामते “Our participation in U.N.O. peac keeping dose not stem from considerations of narrow gain. We have participated because we have been wanted, because we have been asked, but most of all because of our solidarity and sympathy with the affected countries and with the international community.” सन २००५ मध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेचे तत्कालीन सरचिटणीस कोफी अन्नान यांचा ३ दिवसांचा भारत दौरा झाला. यावेळी त्यांनी संयुक्त राष्ट्र संघटनेमध्ये भारताच्या वाढत्या भुमिकेची प्रशंसा केली. संयुक्त राष्ट्र संघटनेने गेल्या साठ वर्षात ५९ शांतीसैनिक मोहिम हाती घेतल्या त्यापैकी ४१ मोहिमामध्ये भारताचा सहभाग होता सध्या युनोच्या १६ मोहीम चालू आहेत. त्यापैकी ९ मोहिमांमध्ये भारताचा सहभाग आहे. यावरून युनोमधल्या भारताच्या वाढत्या सक्रीयतेची जाणीव होते. भारताने विभागीय महासत्ता म्हणून पुढे यावे आशियाई राष्ट्रांचे नेतृत्व करावे हे पंडीत नेहरूंचे स्वप्न होते. त्या दृष्टीने त्यांनी भारतीय परराष्ट्रधोरणाची आखणीदेखील केली होती. एप्रिल १९४७ मध्ये नेहरूंनी स्पष्ट केले की, “ We start at the end an era and on threshold of a new period of history. Asia after a long period a quiescence has suddenly become important again in world affairs.......... it is fitting that india should play her part in the new phase of world affairs.”

२००५ मध्ये इंडोनेशिया येथे पार पडलेल्या आफ्रो आशियाई राष्ट्रांच्या संमेलनामध्ये आशिया, आफ्रि खंडामधील गरीब विकसनशील राष्ट्रांच्या नेतृत्वाची भारताने पुन्हा एकदा धुरा सांभाळावी असा सुर निघाला. हे यश पं.नेहरूंनी आखलेल्या परराष्ट्र धोरणाच्या तत्वानाच जाते.

१९४५ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघटनेची सदस्यसंख्या ५१ एवढी होती ही सदस्यसंख्या वाढून आज १९१ एवढी झाली आहे. त्याप्रमाणात सुरक्षा परिषदेच्या कायम स्वरूपी सदस्यांची संख्यादेखील वाढायला हवी होती. सुरक्षा परिषदेत आशिया आफ्रिका आणि लॅटीन अमेरिकेतील राष्ट्रांना त्यांच्या सदस्य संख्येच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व मिळालेले नाही. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या लोकशाहीकरणाची मागणी आमसभेच्या वार्षिक अधिवेशनात सातत्याने होत आली आहे. अमेरिकेच्या वाढत्या एकाधिकरशाहीला आणि दादागिरीला शह देण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघटनेला सामर्थ्यशाली बनविणे आवश्यक आहे. परिणामी भारताने देखील याला आपल्या परराष्ट्र धोरणाच्या उद्दिष्टांचा एक भाग बनविले आहे. याचा अर्थ भारताचे परराष्ट्र धोरण अमेरिकेच्या बाजूने झुकणारे नाही तर पं.नेहरूंच्या अलिप्तेच्या धोरणानुसार पुढे चालू आहे असेच म्हणावे लागेल.

स्वतंत्र भारताचा आर्थिक विकास व्हायचा असेल तर आपल्या शेजारील राष्ट्रांशी मित्रत्वाचे संबंध असले पाहिजेत असे नेहरूंचे धोरण होते. आजही भारतीय राज्यकर्ते आपल्या शेजारील राष्ट्राशी मित्रत्वाचे संबंध ठेवताना दिसतात, हे काही उदाहरणावरून दिसून येते. १९४९ रोजी स्वातंत्र मिळालेल्या साम्यवादी चिनला सार्वभौम राष्ट्र म्हणून मान्यता दिली आणि संयुक्त राष्ट्रसंघटनेचे सदस्यत्व मिळावे यासाठी प्रयत्न केले एवढेच नव्हेतर U.N.O. च्या सुरक्षा परिषदेचे सभासदत्य मिळावे यासाठी चिनची बाजू उचलून धरली. तिबेट ही चिनचा भाग असल्याचे मान्य केले. भारताच्या चिन बाबतीत असणा-या संबंधावर टिका होत असली तरी बदलत्या परिस्थितीत दोन्ही राष्ट्रांना मैत्रीचे संबंध ठेवावे लागत आहेत.

भारताच्या शेजारी असणारे दुसरे राष्ट्र पाकीस्तान. काश्मिर प्रश्नावरून दोन्ही राष्ट्रांची युदधे झाली. यावेळी भारताला सहज पाकीस्तानावर आक्रमण करून काश्मिर प्रश्न सोडविता असला असता पण भारताने तो प्रश्न लष्करी बळाने न सोडविता तो प्रश्न युनोत नेला व संयुक्त राष्ट्रसंघटनेने सोडवावा अशी विनंती केली. भारताच्या संसदेवरती हल्ल झाला तेव्हा भारत सरकारवर अंतर्गत जनमताचा असा दबाव होता की अमेरिकेने ज्याप्रमाणे अफगाणिस्तानावर हल्ला केला. त्याप्रमाणे भारताने पाकिस्तानावर हल्ला करून दहशतवादी केंद्रे नष्ट करावीत. यावेळी संयुक्त राष्ट्रे व बड्या राष्ट्रांच्या आवाहनाला प्रतिसादर देवून भारताने संयम दाखविला.

श्रीलंकेचे सिंहली आणि तामिळ लोकांच्यामध्ये वांशिकवादी गंभीर स्वरूप धारणे केले होते. तमिळभाषिकांना श्रीलंकेमध्ये अन्याय सहन करावा लागत होता. ते मूळचे भारतीय असल्यामूळे भारताला त्यांच्याविषयी सहानुभूती असणे स्वाभाविक होते. पण तरीही भारताने त्या विषयाबाबत तटस्थता बाळगली. १९८३ मध्ये सिंहली तामिळ वांशिक दंगली उसळली या दंगलीचा परिणाम म्हणून हजारो श्रीलंकन, तमिळ भारतात निर्वासित बनून आले. भारताने त्यातील काहींना नागरिकत्व दिले. पुढे या दंगली एवढ्या वाढल्या की त्या थांबविण्यासाठी श्रीलंकेने भारताकडे मदत मागितली. भारतालाही श्रीलंकेचे राजकीय सार्वभौमत आणि भौगोलिक एकात्मता टिकवायची होती. त्यासाठी १९९७ मध्ये भारत श्रीलंका करार झाला व भारताने श्रीलंकेत शांती सैनिक पाठविले. हा प्रश्न पाठवून सोडविण्याचा प्रयत्न केला.

म्यानमारसोबत भारताचे संबंध १९९२ पासून सुधारत आहे. भारत व भुतान संबंधाची सुरूवात १९४९ च्या करारापासून झाली.

भारताने नेहमीच भुतानच्या सार्वभौमत्वाचा आदर केला. भारताच्या प्रयत्नामूळेच भुतानला सार्क संघटनेचे सभासदत्व मिळाले. एवढेच नव्हेतर भारताने भुतानला वीज प्रकल्प, सिमेंट उद्योग, जलविद्यूत उद्योगधंदे सुरू करून दिले आहे. शिवाय भारत गरीब देशाच्या विकासासाठी जो विकासनिधी देतो त्याच्या जवळजवळ निम्मा विकासनिधी भुतानला मिळतो.

बांगला देशाबरोबरही भारताचे संबंध भारत, पाकीस्तान संबंधासारखे अगदीच ताणलेले किंवा शत्रुत्वाचे नाहीत. बांगला देशाच्या निर्मितीनंतर संयुक्त राष्ट्रसंघात बांगला देशाला सदस्यत्व मिळवून देण्यात भारताने मदत केली एवढेच नव्हेतर दोन्ही देशादरम्यान गंगा नदी पाणी वाटपाच्या प्रश्नावर तोडगा निघाला आहे. सागरी भुसिमा प्रश्न मिटवण्याचा प्रयत्न सुरू आहे. छोट्या छोट्या प्रश्नावरून हे सातत्याने हे संबंध ताणले जाणार नाहीत यासाठी भारत सतत प्रयत्नशील आहे.

नेपाळमध्येही लोकशाही शासन व्यवस्था टिकू शकली नाही ही बाब भारताच्या चिंतेची आहे. नेपाळमधील राजेशाहीला पाठींबा दिला तर भारताने नेपाळमधील राजकीय पक्षाची विश्वासार्हता गमावली असती. याउलट जर राजकीय पक्षांना पूर्ण पाठींबा दिला असता तर माओवादी वरचढ ठरले असते. या पेचप्रसंगात भारतीय नेतृत्वाचे सामंजसपणे तोडगा काढला आहे. शिवाय आपले हित संबंधही सुरक्षीत राखले आहे.

चीन वगळता भारताच्या शेजारी असणारी सर्व राष्ट्रे ही अत्यंत लहान आहेत पण भारताने आजपर्यंत या राष्ट्रांना नेहरूंच्या पंचशील धोरणाप्रमाणे वागणूक दिली आहे. पं.नेहरू हे फक्त राष्ट्रीय नेते नव्हते तर ते आंतरराष्ट्रीय नेते होते. त्यानी भारताच्या परराष्ट्रधोरणाची जी तत्वे प्राचीन इतिहासातून घेतली आहेत. भारत हा गौतम बुध्दांचा महाविरांचा आहे. ज्यांनी सर्व जगात शांततेची बंधुभावाची आणि परस्पर सहकार्याची शिकवण दिली. तीच तत्वे नेहरूनी आपल्या परराष्ट्र धोरणाची तत्वे बनविली आणि आजही भारत त्याच तत्वाच्या आधारे परराष्ट्र धोरण निश्चित करताना दिसतो.

*संदर्भ पुस्तके :–*

१) राजधानीतून – अशोक जैन – राजहंस प्रकाशन
२) भारत नेहरूपासून नंदनवनापर्यंत – शशी थरूर
३) पूणे ते पंतप्रधानांचे कार्यालय – बी.जी.देशमूख, अनुवाद अशोक पाध्ये, मेहता पब्लिशींग
४) प्राचीन भारताचा राजकीय इतिहास – डॉ. शैलेंद्र देवळणकर
५) प्राचीन भारताचा राजकीय इतिहास – हेमचंद्र राय चौधरी, डायमंड पब्लिकेशन
६) भारताचे परराष्ट्रधोरण – डॉ. शांताराम भोगले – विद्या प्रकाशन
७) भारतीय लोकशाही, डॉ. संजय गोरे – साईनाथ प्रकाशक
८) भारताची विदेशनीती – श्रीकांत वि. देशपांडे – श्री. मंगेश प्रकाशन
९) परराष्ट्रधोर आपले शेजारी – ना.य.डोळे – ज्ञानयज्ञ प्रकाशन
१०) भारताचे व्यक्तीमत्व – श.आ.साळी – स्नेहवर्धन प्रकाशक